# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 06 April 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.

****

शिवसेना शिंदे गटाचे कल्याणचे विद्यमान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हेच महायुतीचे उमेदवार असतील. महायुतीतील भारतीय जनता पक्षासह सर्व घटक पक्ष त्यांना मताधिक्याने निवडून आणतील, असं भाजपचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केलं. भाजपा पक्ष स्थापना दिनानिमित्त नागपुरात आयोजित कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. भारतीय जनता पक्ष हा देशातील सर्वाधिक सदस्य असलेला, त्याचप्रमाणे सर्वात जास्त लोकप्रतिनिधी असणारा पक्ष आहे. या पक्षात कधीच फूट पडली नाही, कारण या पक्षाचे कार्यकर्ते आत्मकेंद्रित नाहीत, असं त्यांनी सांगितलं. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह इतर नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

***

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षानं आज आणखी सहा उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यात गोवा राज्यातल्या उत्तर गोवा मतदारसंघासाठी रमाकांत खलप, दक्षिण गोवा मतदार संघासाठी कॅप्टन विरीयटो फर्नांडिस यांना, मध्य प्रदेशातल्या मोरेना मतदार संघासाठी सत्यपालसिंग सिकरवार, ग्वाल्हेरसाठी प्रवीण पाठक, तर खंडवा लोकसभेसाठी नरेंद्र पटेल यांना उमेदवारी दिली आहे. दादरा आणि नगर हवेली इथल्या एका जागेसाठी अजीत रामजीभाई महला यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या सुमारे दोन हजार ९९४ पूर्णांक ५४ हेक्टर शासकीय जमिनीची शेतकऱ्यांच्या नावावर खोटी नोंद करत, ऑनलाईन सेवा केंद्र चालकांनी शासनाची आणि विमा कंपन्यांची फसवणूक केल्याचं उघड झालं आहे. या प्रकरणी २४ सेवा केंद्र चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात बीड जिल्ह्यातले

१६, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातले दोन, परभणी दोन, नांदेड एक, तसंच सोलापूर एक आणि धाराशिव जिल्ह्यातल्या एका सेवा केंद्राचा समावेश आहे. शासकीय जमिनीचे कोणतेही भाडेकरार किंवा संमतीपत्र नसतांना सुमारे एक हजार एकशे सत्तर शेतकऱ्यांच्या नावावर खोट्या नोंदी दाखवत हा पीक विमा या केंद्र चालकांनी भरला होता, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

मराठवाड्यातले पहिले प्लास्टिक सर्जन दिवंगत डॉ. अविनाश येळीकर यांच्या पहिल्या स्मृतीदिनानिमित्त आज सायंकाळी छत्रपती संभाजीनगरच्या आयएमए सभागृहात विशेष जनजागृती कार्यक्रम होणार आहे. संध्याकाळी पाच ते सात या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमात डॉ. जगन्नाथ दीक्षित आणि सोलापूरचे डॉ. गुणवंत चिमणचौडे यांची व्याख्यानं होणार आहेत. यानंतर तज्ज्ञांच्या गटचर्चा कार्यक्रमात डॉ. संजय कदम, डॉ. जितेन कुलकर्णी, डॉ. रमाकांत बेंबडे, डॉ. उज्वला दहिफळे, डॉ. मंगेश तांदळे सहभागी होणार आहेत, अशी माहिती आयएमएच्या वतीनं देण्यात आली आहे.

****

मुस्लिम धर्मीयांसाठी पवित्र असलेल्या रमजाम महिन्यातील शब-ए-कद्र आज साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्तानं सर्व मशिदींमध्ये आज रात्रभर नमाज अदा केली जाते. शहरातल्या प्रसिद्ध जामा मशिदीत विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलेलं आहे, तसंच इतर मशिदींमध्येही प्रार्थना केली जाणार आहे.

****

ख्रिस्ती समाजाचे सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांनी छत्रपती संभाजीनगर धर्मप्रांताच्या महागुरूस्वामीपदी बर्नार्ड लॅन्सी पिंटो यांची नियुक्ती केली आहे. आज सायंकाळी साडे चार ते साडे नऊ या वेळेत त्यांचा दीक्षाविधी आणि पदग्रहण समारंभ होणार असून, छावणीतील होलीक्रॉस इंग्रजी शाळेच्या मैदानावरील या सोहळ्याला भाविकांनी उपस्थित राहण्याचं आवाहन धर्मप्रांताचे चान्सलर रेव्हरंड फादर डॉ. वलेरियन फर्नांडिस यांनी पत्रकार परिषदेत केलं आहे.

****

सिंधी समाजाचं आराध्य दैवत भगवान झूलेलाल यांचा जन्मोत्सव छत्रपती संभाजीनगर शहरात बुधवारी, १० एप्रिल रोजी उत्साहात साजरा केला जाणार आहे. यानिमित्तानं आज सायंकाळी सिंधी कॉलनीतील संत कंवरधाम मैदानावर फन-फेअर आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. उद्या रविवारी

आरोग्यावरील चर्चासत्र, सोमवारी छप्पनभोग, धुनिसाहेब कार्यक्रम आणि मंगळवारी सिंधी समाज प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना खेळवला जाईल. बुधवारी प्रभातफेरी आणि सायंकाळी शोभायात्रा काढली जाईल. भाविकांनी सहभागी होण्याचं आवाहन झूलेलाल सेवा समितीचे अध्यक्ष राजू तनवाणी यांनी केलं आहे.

****

नांदेड इथल्या कवयित्री मीनाक्षी आचमे-चित्तरवाड यांच्या `इटुकली पिटुकली` बालकवितासंग्रहाला अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे दोन पुरस्कार जाहीर झाले आहेत. शिशुसाहित्य या विभागात उत्कृष्ट प्रकाशनासाठीचा प्रथम पुरस्कार, तर उत्कृष्ट मुखपृष्ठ विभागात याच संग्रहाचे मुखपृष्ठ तयार करणारे चित्रकार संतोष घोंगडे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या २८ एप्रिल रोजी पुणे इथं या पुरस्कारांचं वितरण होणार आहे, अशी माहिती इसाप प्रकाशनाचे दत्ता डांगे यांनी दिली आहे.

****

बीड जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या परिसरात आज स्वछता मोहीम राबवण्यात आली. रुग्णालयाच्या सर्व डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी आणि विद्यार्थांनी या मोहिमेत सहभाग घेतला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडे, डॉ. लक्ष्मण तांदळे आदी उपस्थित होते.

****